**We are Proud of our Alumni !! आम्हांला आमच्या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे.**






**Mr. Aditya R Abhang, Completed Diploma in Mechnaical Engineering from Batch 2013-14**
**MET's Institute of Technology-Polytechnic, Nashik and** Graduate Post persuing Currently Programme at Indian Institute of Management(IIM) ,Raipur

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर , देशाच्या सर्वांगीण विकासासाठी, भारत सरकारने १५ मार्च, १९५० मध्ये, आर्थिक प्रगतीसाठी रीतसर नियोजन आयोगाची (Planning Commission ) स्थापना केली. नियोजन आयोगचे पदसिध्द अध्यक्ष म्हणून पंतप्रधानांची नेमणूक करण्यात आली . त्यावेळी देशाचे पहिले पंतप्रधान पं . जवाहरलाल नेहरू हे नियोजन आयोगाचे पदसिध्द अध्यक्ष बनले. नियोजन आयोगाचे मुख्य काम देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी कालबद्ध योजना तयार करून, केलेल्या कामाचं मूल्यमापन करणं हे ठरविण्यात आले. देश प्रगती पथावरून जात होता. देशाच्या विकासासाठी पायाभूत साधन सामुग्री व सुविधा निर्माण करणं हे उद्दीष्ट समोर ठेवून, पहिल्या व दुसऱ्या नियोजन आयोगाच्या शिफारशीनुसार, देशांत मोठमोठी धरणं बांधणं, आधुनिक शिक्षण व संशोधन संस्था निर्माण करणं आणि पोलाद उद्योगासारखे, सार्वजनिक प्रकल्प उभारणी ह्याला प्राधान्य देण्यात आलं . पं . नेहरुंनी या सर्वांना "आधुनिक भारताच्या तीर्थस्थळांची " उपमा दिली. अशा परिस्थितीत, देशातील सार्वजनिक व खाजगी उद्योग समूहांना, कुशल मनुष्यबळ व त्या मनुष्यबळाला नियंत्रित करू शकतील अशा उत्तम व्यवस्थापकांची उणीव भासू लागली. भारतीय उद्योगसमूहांची ही अडचण लक्षात घेऊन, नियोजन आयोगाने १९५९ मध्ये, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया (UCLA ) या संस्थेचे असोसिएट डीन प्रा . जॉर्ज रॉबिन्स यांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली. भारतातील परिस्थितीचा अभ्यास करून ,त्यांनी नियोजन आयोगाला अमेरिकेच्या धर्तीवर उत्कृष्ठ व्यवस्थापन शिक्षण व संशोधन संस्था सुरु करण्याचा सल्ला दिला. त्यांच्या सूचनेनुसार, भारत सरकारने दोन प्रमुख पायाभूत व्यवस्थापन संस्था सुरु करण्याचा निर्णय घेतला. अशा प्रकारे, देशातील पहिली भारतीय व्यवस्थापन संस्था (Indian Institute of Management - IIM) ही १३ नोव्हेंबर १९६१ साली कलकत्ता (सध्याचे कोलकाता) येथे अमेरिकेतील विख्यात MIT Sloan School of Management यांच्या सहाय्याने, तसेच प .बंगाल सरकार, फोर्ड फॉउंडेशन व काही भारतीय उद्योग यांच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आली. त्यानंतर लगेचच, महिन्याभरात दुसरी भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) डिसेंबर १९६१ मध्ये, अहमदाबाद येथे Harvard Business School च्या पुढाकाराने उभारण्यात आली. १९७२ मध्ये, श्री. रवी जे. मथाई यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या दोन संस्थांच्या विस्तृत परीक्षणानंतर , त्यांच्या यशस्वितेची ग्वाही देत, केंद्र सरकारला, अशा आणखी दोन संस्था स्थापन करण्याची सूचना केली. त्यानुसार सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांतील उद्योगांची गरज लक्षात घेऊन, १९७३ मध्ये, बेंगलोर येथे तिसऱ्या IIM ची स्थापना करण्यात आली . नंतरही वाढत्या औद्योगिक क्षमतेनुसार, वेळोवेळी केंद्र शासनाने, IIM च्या संख्येत वाढ केली. सद्यस्थितीत भारतातील एकूण IIM ची संख्या २० असून त्यांत कोलकाता, अहमदाबाद , बेंगलुरू, लखनौ, कोझिकोड , इंदोर, शिलॉंग ,उदयपूर, रायपुर, त्रिची, रोहतक, रांची,काशीपूर, नागपूर, अमृतसर, बोधगया, सिरभौर , विशाखापट्टणम संबलपूर व जम्मू येथील IIM चा समावेश होतो.

भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) ह्या भारतातील व्यवस्थापन शाखेतील शिक्षण व संशोधनासाठीच्या सर्वोच्च संस्था असून, तिथे व्यवस्थापनाशी निगडित पदव्युत्तर पदवी, डोक्टरेट व विशिष्ट असे Executive अभ्यासक्रम शिकविले जातात. २०१७ मध्ये, भारतीय व्यवस्थापन कायद्या अंतर्गत देशातील सर्व IIM's ना राष्ट्रीय महत्वाच्या (National Importance) संस्थेचा दर्जा देण्यात आला आहे. त्यानुसार, IIM's ना त्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमांत अभ्यासक्रम, कालावधी, शिक्षण शुल्क व तद्नुषंगिक गोष्टींसाठी स्वायत्तता प्राप्त झाली. सर्व IIM's मध्ये, दोन वर्ष कालावधीचे Post

Graduate Programme in Management (PGM) व Post Graduate Diploma in Management (PGDM) हे अभ्यासक्रम राबविले जातात. भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) रायपूर ही २०१० मध्ये स्थापण्यात आलेली संस्था असून त्यांत वर उल्लेखलेले दोन वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम राबविले जातात. यातील Post Graduate Programme (PGP) हा अभ्यासक्रम Trimester पध्दतीने म्हणजे शैक्षणिक वर्ष हे प्रत्येकी तीन सत्रांत (जुन ते एप्रिल ) याप्रमाणे विभागले जाते. पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमात, व्यवस्थापन शाखेतील मूलभूत विषयांचा समावेश असतो. दुसऱ्या वर्षात विद्यार्थ्यांना उपलब्ध विषयांमधून ऐच्छिक वैकल्पिक विषय निवडण्याची मुभा असते. PGP ह्या अभ्यासक्रमांत मुख्यतः व्यवस्थापन शास्त्रांतील विषयांसह, Accounting , Behavioral Science , Finance , Economics , Human Resource Management , Business Operations , Business Mathematics , Public Policy , Statistics, Decision Analysis , अशा विषयांचा समावेश होतो.

**श्री. आदित्य राजेंद्र अभंग** हा मेट पॉलीटेकनिकच्या यंत्र अभियांत्रिकी विभागातील, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील उत्तीर्ण विद्यार्थी, सध्या भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) रायपूर येथे Post Graduate Programme (PGP) हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करत आहे. PGP या अभ्यासक्रमातील, IIM प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना सामायिक प्रवेश परीक्षा (Common Aptitude Test-CAT) द्यावी लागते. IIM प्रवेशाच्या प्राथमिक फेरीसाठी, CAT परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात. ही परीक्षा जागतिक दर्जाची परीक्षा समजण्यात येते. यातील सहभागी विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण (Sucess Rate ) २०० विद्यार्थ्यांमधून १ असे आहे. CAT परीक्षेतील गुणांसोबतच पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेच्या पुढील फेरीत वैयक्तिक अनुभव क्षमता, निबंध लेखन (Essay Writing ), समूह चर्चा (Group Discussion ), व तज्ञ मुलाखत (Panel Interview ) ला सामोरे जावे लागते. त्यानंतरच , प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची अंतिम यादी जाहीर केली जाते. अशाप्रकारे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षमतेबरोबरच अंगभूत कौशल्यांचा (नेतृत्व क्षमता, तार्किक विचार, समयसूचकता, संभाषण कौशल्य ) कसोटी पाहणाऱ्या निवड प्रक्रियेत भावी नेतृत्व क्षमता (Future Leadership Potential ) हा घटक अत्यंत महत्वाचा ठरतो.

आदित्यचे वडील श्री. राजेंद्र अभंग हे इलेक्ट्रॉनिक्स व आई सिव्हील इंजिनिअर असून, नाशिक येथील अनुक्रमे, हिंदुस्थान एरॉनॉटिकस लिमिटेड व सार्वजनिक बांधकाम विभागमध्ये (PWD) कार्यरत आहे. त्याची लहान बहीण संगणक अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे. कुटुंबातल्या या उत्तम शैक्षणिक व अभियांत्रिकी पार्श्वभूमीचा त्याला त्याच्या शैक्षणिक कारकिर्दीत चांगलं उपयोग झाला. मेट पॉलीटेकनिकच्या, मेकॅनिकल विभागांत , पदविका (Diploma) करत असतांना, अभ्यासासोबतच, विभागाच्या व संस्थेच्या विविध उपक्रमांत तो उत्स्फूर्तपणे सहभागी होत असे. २०१३ मध्ये, राज्यस्तरीय मेट रोबॉट्रिकस या टेकनिकल पेपर प्रेसेंटेशन स्पर्धेत सहभागी होत, त्याने दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळवले होते. स्वभावाने शांत, संयमी, नम्र आणि अभ्यासू असणाऱ्या आदित्यने विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होत पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर, पुणे विद्यापीठांतर्गत, अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेत, तिथेही अभ्यासक्रमासोबतच वेगवेगळ्या स्थानिक, विभागीय व राज्य स्तरीय टेकनिकल पेपर प्रेसेंटेशन स्पर्धेत भाग घेत, विशेष प्राविण्यासह पदवी प्राप्त केली. त्यानंतर, वर उल्लेखल्याप्रमाणे,अत्यंत मेहनतीने व आत्म विश्वासाने CAT परीक्षेचा टप्पा पार पाडत भविष्यातील उत्तम व्यवस्थापक घडविणाऱ्या भारतीय व्यवस्थापन संस्थेत, प्रवेश मिळवण्याचे स्वप्न पूर्ण केले. IIM मध्ये, शैक्षणिक व औद्योगिक अनुभव असणारे उत्तम प्राध्यापक, व्यवस्थापनातील सातत्याने बदलणाऱ्या नव नव्या संकल्पनांची करून दिली जाणारी ओळख, तसेच अभ्यासात करण्यात आलेल्या उद्योग व्यवसायातील खऱ्या खुऱ्या प्रश्नांचा समावेश (Live Case Studies) व त्यावर विद्यार्थ्यांमध्ये होणाऱ्या अभ्यासपूर्ण समूह चर्चा, बौद्धिक (Brainstorming) याच्या परिणामतः ,तिथेही आदित्यने, आपल्या गुणवत्तेला वाव देत, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होत यश मिळवले. त्याच अंतर्गत, रिलायन्स उद्योग समूहाच्या विकासासाठी कल्पक योजना शोधण्याच्या राष्ट्रीय स्तरावर आयोजित "Reliance TUP - ५" या स्पर्धेत, देशभरातून, विविध नामांकित संस्थेतून सहभागी झालेल्या २८०० संघातून त्याच्या संघाची, अंतिम फेरीसाठी झालेली निवड, ही मोठी उपलब्धी आहे. त्याचप्रमाणे, Indian School of Business तर्फे वर्ष २०१९ मध्ये आयोजित राष्ट्रीय स्तरावरील सिम्युलेशन स्पर्धेत, त्याला विजेतेपद मिळाले होते.

सध्या शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना स्वानुभव सांगताना तो म्हणतो, "तुमच्या दीर्घ शैक्षणिक प्रवासाची डिप्लोमा ही पहिली व अत्यंत महत्वाची पायरी असल्यामुळे, डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांनी, डिप्लोमा नंतरची आपली भावी शैक्षणिक वाटचाल (सरकारी व खाजगी नोकरी , उच्च शिक्षण, स्वतःचा उद्योग व्यवसाय यांनुसार पर्यायांची निवड) ठरवून , त्याची भविष्यवेधी योजना आखून, त्यानुसार मार्गक्रमण करणे आवश्यक आहे. शिक्षणासोबतच विभागाच्या व संस्थेच्या विविध उपक्रमात सहभागी होत सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास (उत्तम सवांद कौशल्य , अद्ययावत तांत्रिक ज्ञान इ. ) साधने महत्वाचे असून, त्याचा फायदा, तुमच्या भावी व्यावसायिक वाटचालीसाठी नक्कीच होईल याची खात्री आहे."

"बोर्डरूम" या व्यवस्थापन दुनियेची रोमहर्षक सफर करून देणाऱ्या पुस्तकात ले . अच्युत गोडबोले, म्हणतात त्याप्रमाणे, भारतीय आणि मुख्यतः महाराष्ट्रीयन मुलांमध्ये जोखीम घेऊन, अपयशाला सामोरे जात, स्वकर्तृत्वावर उद्योजक होण्याचे प्रमाण खूपच कमी असून, त्याचा परिणाम आपल्या उद्योगांवर व अर्थ व्यवस्थेवर होत असतो. आपण जाणीवपूर्वक, उद्योजकता वाढवली आणि तशा संधी मिळवून दिल्या तर नक्कीच ही परिस्थिती बदलू शकते. याच प्रेरणेसह, आदित्यने देखील व्यवस्थापन तत्वांचा (Management Principles) चा कल्पक वापर करत शैक्षणिक प्रगती साधत, आपल्या व्यावसायिक कारकिर्दीची यशस्वी सुरवात करण्यासाठी **मनःपूर्वक शुभेच्छा !!!**

**अमोल पुरुषोत्तम वडनेरे ,**
विभागप्रमुख - यंत्र अभियांत्रिकी विभाग ,
मेट पॉलीटेकनिक-भुजबळ नॉलेज सिटी , नाशिक .